सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे — ४११००७
Savitribai Phule Pune University
Ganeshkhind, Pune - 411007

दूरध्वनी क्रमांक: ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in

परिपत्रक क्र. २३७ /२०२६

विषय : विद्यार्थी सुरक्षा विमा, विद्यार्थी विकास निधी, विद्यार्थी आरोग्य सेवा योजना, आपत्ती व्यवस्थापन निधी, विद्यापीठ क्रीडा मंडळ व शारीरिक शिक्षण मंडळ निधी, नोंदणी शुल्क, संगणक शुल्क व विकास निधीतील विद्यापीठ हिस्सा ऑनलाईन पध्दतीने पाठविण्याबाबत.

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६—२७ मध्ये संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था तसेच स्वायत्त महाविद्यालयामध्ये विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्कातील विद्यापीठाचा हिस्सा ऑनलाईन पध्दतीने चलनाद्वारे **दि. ३० नोव्हेंबर, २०२६** पूर्वी विद्यापीठास पाठविण्यात यावा. विद्यापीठ हिस्सा पाठविताना, खालील सूचना विचारात घ्याव्यात.

१) सर्व विद्याशाखेतील सर्व प्रगत अभ्यासक्रम (पूर्वीचे पदविका), पदवी, पदव्युत्तर व पीएच्. डी. अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्कामधील विद्यापीठ हिस्सा मुद्दा क्र. ५ मध्ये नमूद शुल्क तक्त्यानुसार पाठवावा.

२) ऑनलाईन प्रो—रेटा व इतर निधी संबंधी माहिती भरण्याची ऑनलाईन प्रक्रिया बी.ओ.डी. पोर्टल अंतर्गत दिली आहे. **BOD Login** मध्ये 'प्रो—रेटा ऑनलाईन' टॅब वापरून सदरची माहिती भरावयाची आहे. या संदर्भात माहिती पुस्तिका (User Manual) महाविद्यालय/परिसंस्थेच्या Login मध्ये उपलब्ध आहे.

३) प्रो—रेटाचे चलन काढताना सर्व अभ्यासक्रमांचे मिळून एकच चलन काढावे. **प्रत्येक अभ्यासक्रमाचे वेगवेगळे चलन काढण्याची आवश्यकता नाही.** चलन भरल्यानंतर Print Report उपलब्ध होईल तो download करून त्यावर मा. प्राचार्य/संचालक यांनी स्वाक्षरी करून तो Upload Report येथे Upload करावा. **सदर Report/चलन/यादी इत्यादी विद्यापीठात स्वतंत्रपणे सादर करण्याची आवश्यकता नाही.**

विशेष सूचना :

१) विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्कातील विद्यापीठाचा हिस्सा आदेश क्रमांक PGS/676, Dt. 28.2.2020 नुसार विद्यापीठास पाठवायचा आहे.
२) अश्वमेध शुल्क (क्रीडा महोत्सव) वाढीव शुल्क क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संदर्भ पत्र क्र. विक्रीमं/३/६७९६, दि. २० ऑक्टोबर, २०२३ अन्वये घेण्यात येत आहे.
३) रासेयो स्वयंनिर्वाह एकक शुल्क हे राष्ट्रीय सेवा योजना या विभागाचे संदर्भ पत्र क्र. रासेयो/२०२४—२५/१८७, दि. २०/०८/२०२४ अन्वये घेण्यात येत आहे.
४) व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शुल्क व्यावसायिक दरानुसार पाठवावे.
५) परदेशी/सार्क देशातील विद्यार्थ्यांच्या शुल्कातील विद्यापीठाचा हिस्सा संदर्भ क्र. आयएससी/१०५० व १०५०—ए, दि.९ जून, २००८ नुसार पाठवावा.
६) नियमित प्रवेशित प्रती विद्यार्थ्यांमागे रु. १५/— प्रमाणे स्थानिक विभागीय क्रीडा समितीचा (उदा. पुणे शहर/अहमदनगर/पुणे जिल्हा/नाशिक) देय असलेला प्रो—रेटा संबंधित विभागीय समितीकडे पाठविणे आवश्यक आहे. सदर प्रो—रेटा न भरल्यास संबंधित महाविद्यालयातील/परिसंस्थेतील खेळाडूंना आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत सहभाग घेता येणार नाही. (टिप — वरील बाबतचे विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ यांचे जावक पत्र क्र. विक्रीमं/३.३/५७९, दि. ०६ ऑगस्ट, २०२६ नुसार कार्यवाही करावी).

५) **शुल्काचा तक्ता**

<table>
<tr><th rowspan="3">अ. क्र.</th><th rowspan="3">विभाग</th><th rowspan="3">निधी/शुल्काचे शिर्षक</th><th rowspan="3">अभ्यासक्रम</th><th colspan="3">विद्यापीठ हिस्सा रु.मध्ये</th></tr>
<tr><th colspan="2">व्यावसायिक अभ्यासक्रम</th><th rowspan="2">अव्यावसायिक अभ्यासक्रम</th></tr>
<tr><th>पदवी</th><th>पदव्युत्तर</th></tr>
<tr><td rowspan="3">१</td><td rowspan="3">विद्यार्थी विकास मंडळ</td><td>विद्यार्थी विकास निधी</td><td>पदवी व पदव्युत्तर</td><td>४०</td><td>२०</td><td>४०</td></tr>
<tr><td>विद्यार्थी सुरक्षा विमा निधी</td><td>पदवी व पदव्युत्तर</td><td colspan="2">२०</td><td>२०</td></tr>
<tr><td>आपत्ती व्यवस्थापन निधी</td><td>पदवी व पदव्युत्तर</td><td colspan="2">१०</td><td>१०</td></tr>
<tr><td>२</td><td>राष्ट्रीय सेवा योजना</td><td>रासेयो स्वयंनिर्वाह एकक शुल्क</td><td>पदवी व पदव्युत्तर</td><td colspan="2">२०</td><td>२०</td></tr>
<tr><td rowspan="4">३</td><td rowspan="4">विद्यापीठ क्रीडा मंडळ</td><td>विद्यापीठ जिमखाना शुल्क</td><td>पदवी व पदव्युत्तर</td><td colspan="2">५०</td><td>५०</td></tr>
<tr><td>अश्वमेध शुल्क (क्रीडा महोत्सव)</td><td>पदवी व पदव्युत्तर</td><td colspan="2">२६</td><td>२६</td></tr>
<tr><td>कॉर्पस फंड</td><td>पदवी व पदव्युत्तर</td><td colspan="2">०४</td><td>०४</td></tr>
<tr><td>स्पोर्टस फंड (FIT India)</td><td>पदवी व पदव्युत्तर</td><td colspan="2">५०</td><td>५०</td></tr>
<tr><td rowspan="3">४</td><td rowspan="3">शैक्षणिक प्रवेश विभाग</td><td>नोंदणी शुल्क</td><td>पदवी व पदव्युत्तर</td><td colspan="2">२५</td><td>२५</td></tr>
<tr><td>संगणक शुल्क</td><td>पदवी व पदव्युत्तर</td><td colspan="2">२५</td><td>२५</td></tr>
<tr><td>विकास निधी</td><td>पदवी व पदव्युत्तर</td><td colspan="2">५०</td><td>२५</td></tr>
<tr><td>५</td><td>आरोग्य केंद्र</td><td>विद्यार्थी आरोग्य सेवा योजना</td><td>पदवी</td><td colspan="2">२०</td><td>२०</td></tr>
</table>

वरील सूचना विचारात घेऊन शुल्क/निधीतील विद्यापीठ हिस्सा पाठवावा. पुढे असेही कळविण्यात येते की, अंतिम मुदतीपर्यंत चलनप्राप्त न झाल्यास अशा महाविद्यालयाबाबत विद्यापीठ अधिकार मंडळ जो निर्णय घेईल तो बंधनकारक राहील, कृपया याची नोंद घ्यावी.

28/10/2026

(डॉ. दत्तात्रय कुटे)
उपकुलसचिव

गणेशखिंड, पुणे – ४११००७
संदर्भ : शै. प्रवेश/ ४९३९
दिनांक : २८/१०/२०२६

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे–०७.

प्रत :
मा. वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे–०७.
मा. संचालक, विद्यार्थी विकास, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे–०७.
मा. संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे–०७.
मा. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे–०७.
मा. आरोग्य अधिकारी, आरोग्य केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे–०७.